महाराष्ट्र शासन
गृह विभाग,
मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२ २२७९४२४०

Email ID : home_special1a@maharashtra.gov.in

दिनांक : १८ ऑक्टोबर, २०२४.

क्र.लोसनि-१०२४/७५१/प्र.क्र.१००/विशा-१ अ,

प्रति,

१) प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) अतिरिक्त पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) विशेष पोलीस महानिरीक्षक (सर्व परिक्षेत्रे),
६) विभागीय आयुक्त (सर्व विभाग)
७) सर्व पोलीस आयुक्त,
८) सर्व जिल्हादंडाधिकारी,
९) सर्व पोलीस अधिक्षक,

विषय :- विधानसभा सार्वत्रिक निवडणूका-२०२४ करिता पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना पदनिर्देशित करण्याबाबतची अधिसूचना.

महाराष्ट्रातील २८८ विधानसभा मतदारसंघासाठीच्या दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी होणाऱ्या निवडणूका पार पाडण्याच्या दृष्टीने पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना पदनिर्देशित करण्यासंबंधी शासनाने दिनांक १८ ऑक्टोबर, २०२४ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेची (मराठी व इग्रंजी) प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

(हेमंत महाजन)
उप सचिव, गृह विभाग.

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-

मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव,
मा.सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक,
अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,
अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहाय्यक,
प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहाय्यक,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (विशा-१ अ)

RNI No. MAHBIL/2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १०, अंक ११०] शुक्रवार, ऑक्टोबर १८, २०२४/आश्विन २६, शके १९४६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक २२५

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग (विशेष-१अ)

२ रा मजला, मंत्रालय (मुख्य इमारत),
मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ ऑक्टोबर २०२४.

अधिसूचना

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१.

क्रमांक विसनि-१०२४/७५१/प्र.क्र. १००/विशा-१अ.—लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ (१९५१ चा ४३) यांच्या कलम २८-अ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन खालील पोलीस अधिकाऱ्यांना दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणूक-२०२४ करिता महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा मतदार संघांच्या निवडणुका घेण्यासंबंधीची अधिसूचना काढण्यात आल्याच्या दिनांकापासून सदर निवडणुकीचा निकाल घोषित होण्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीकरिता उक्त निवडणुका पार पाडण्याकरिता याद्वारे पदनिर्देशित करीत आहे व तद्नुसार असे अधिकारी त्या कालावधीमध्ये निवडणूक आयोगाचे नियंत्रण, अधिक्षण आणि अनुशासन यांच्या अधीन असतील :—

(१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,

(२) अप्पर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य,

(३) सर्व पोलीस आयुक्त,

(४) विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई,

(५) विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,

(६) सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक,

(७) सर्व सह पोलीस आयुक्त,

(८) सर्व अप्पर पोलीस आयुवत, पोलीस आयुवतालये,

(९) सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक,

(१०) सर्व पोलीस उप आयुक्त, पोलीस आयुक्तालये,

(११) सर्व जिल्ह्यांचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक,

(१२) महाराष्ट्रातील सर्व मतदार संघांतील सर्व पोलीस उप अधीक्षक/उप विभागीय पोलीस अधिकारी,

(१३) सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्तालये,

(१४) महाराष्ट्रातील सर्व मतदारसंघांतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक.

(१५) महाराष्ट्रातील सर्व मतदारसंघांतील पोलीस हवालदार, नाईक आणि शिपाई.

(१६) कोणत्याही नावाने संबोधल्या जाणाऱ्या त्यावेळी राज्याकडे नेमून दिलेल्या कोणत्याही पोलीस दलाचा सदस्य असलेला व ज्यांना निवडणूक विषयक काम सोपविलेला कोणताही अन्य पोलीस अधिकारी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**हेमंत महाजन,**
शासनाचे उप सचिव.